**मे. कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लिमिटेड, गौतमनगर, कोळपेवाडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर, महाराष्ट्र यांच्या नविन १६ मेगा वॅट क्षमतेच्या सहवीज निर्मिती प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी बाबतचा इतिवृत्तांत :**

मे. कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लिमिटेड, गौतमनगर, कोळपेवाडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर, महाराष्ट्र यांच्या नविन १६ मेगा वॅट क्षमतेच्या सहवीज निर्मिती प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी सदर कारखाना परिसरात दि. १३ नोव्हेंबर २०१८ मंगळवार रोजी सकाळी ११-०० वाजता आयोजित करण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-९६/२०१८ पत्र क्रं. बीओ/जेडी (डब्ल्यूपीसी) / पीएच / बी-४१२४ दि. ०५/११/२०१८ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात आली. त्यास अनुसरुन सदर सुनावणीस पुढीलप्रमाणे सदर समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

१. श्री. प्रशांत पाटील
निवासी उपजिल्हाधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर : अध्यक्ष

२. श्री.अ.म.करे
प्रभारी प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नाशिक : सदस्य

३. श्री. अजित पाटील
उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, अहमदनगर : समन्वयक

श्री. अजित पाटील, समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली.

सदर उदयोगाने पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर केला होता. भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या दि. १४-०९-२००६ च्या नोटीफिकेशन नुसार सदर उदयोगास पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेणे बंधनकारक आहे. सदर प्रकल्पासंबंधीची माहिती असलेले दस्तऐवज खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध होते.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर
२. जिल्हा उदयोग केंद्र, अहमदनगर
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर
४. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
५. मुख्यालय, मप्रनि मंडळ, मुंबई.

६. प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, नाशिक

७. प्रांत अधिकारी कार्यालय शिर्डी.

८. तहसिल कार्यालय, कोपरगांव

९. ग्रामपंचायत कार्यालय, कोळपेवाडी, शहाजापूर, कोळगांव थडी, सुरेगांव, मढी बु. ,माहेगांव देशमुख, कुंभारी, वेळापूर, देर्डे चांदवड, धारणगांव,ता. कोपगांव, जि. अहमदनगर.

पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीची सुचना दि. ०७/१०/२०१८ रोजी इंग्रजी वर्तमानपत्र – टाईम्स ऑफ इंडीया, पान नं. १९ व मराठी वर्तमानपत्र दै.लोकमत, हॅलोनगर, पान नं. ४ वर प्रसिध्द करण्यात आली होती व या सुचनेत सदर प्रस्तावा संबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका – टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर सुनावणीचे आयोजन करण्यात आल्याचे नमुद केले आहे.

समन्वयक यांनी अध्यक्ष, जाहीर लोक सुनावणी समिती यांना सदर प्रकल्प धारकांस / त्यांचे प्रतिनिधीस सादरीकरण करण्याचे आदेश देण्याची विनंती केली. तसेच त्यांनी नमुद केले की, अदयापावेतो सदर प्रकल्पाबाबत कोणतीही लेखी हरकत प्राप्त झालेली नसून कोणास कांही लेखी / तोंडी आक्षेप नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी प्रकल्पाचे प्रतिनिधी यांना प्रकल्पाबददल सादरीकरण करण्याचे आदेशित केले.

प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागारांनी पर्यावरणविषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाद्वारे उपस्थित जनसमुहास दिली असून सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इंग्रजी इतिवृत्तांत समाविष्ट करण्यात आली आहे.

प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे सादरीकरण झाल्यानंतर मा. अध्यक्षांनी उपस्थितांना आपल्या लेखी / तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडाव्यात जेणेकरून पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल असे नमुद केले. तसेच प्रथम आपण आपले नांव, गांव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवा.

## जनसुनावणी इतिवृत्त (प्रोसेडिंग) :

## उपस्थितांनी मांडलेले मुददे :

१. श्री. चांगदेव संपतराव होन
रा. देर्डे चांदवड, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर यांनी पुढीलप्रमाणे मुददे मांडले.

माझे गांव ८ ते ९ कि.मी. वर आहे. मी कारखान्याचा सभासद आहे. १६ मेगा वॅट कारखान्याची निर्मीती बाबतची माहिती काळजीपुर्वक ऐकून घेतली. हा प्रोजेक्ट यापुर्वीच व्हायला हवा होता. उपस्थित सर्व शेतक-यांची हरकत नाही. या कारखान्यामुळे आमच्या मुलांना नोक-या व नविन उत्पादन स्तोत्रामुळे टन रेट जास्त मिळेल. रासायनिक खतांमुळे पर्यावरणाचा –हास होत आहे. या संदर्भात शिर्डीमध्ये मा. श्री. सुभाषजी पालेकर

साहेब यांचे नैसर्गीक शेती या विषयावर शिबीर झाले. या परिसरातील बरेचशे शेतकरी त्या शिबीराला हजर होते आणि मी स्वत:ही होतो. चेअरमन साहेब सुध्दा उपस्थित होते. उदघाटनाच्यावेळी वित्त आयोगाचे उपाध्यक्ष साहेब आले होते. आमच्या गांवातील २-४ जणांनी २-४ वर्षांपासून रासायणिक खते न वापरता नैसर्गीक पध्दतीने शेती सुरु केली आहे त्यामुळे आमचे शेतकरीसुध्दा सर पर्यावरणासाठी मदत करतील आणि कारखानासुध्दा त्यादृटीने परिसरातील लोकांमध्ये तशी जनजागृती करील आणि त्यामुळे या प्रकल्पाविषयी आमची कुठलीही शंका नाही आणि आमची कुठलीही हरकत नाही.

२. श्री. शिवाजीराव राजेंद्र वाबळे.

रा. शहाजापुर, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर यांनी पुढीलप्रमाणे मुददे मांडले.

१६ मेगावॅटचा प्रकल्प कारखाना उभारणार आहे ही चांगली सुचक गोष्ट आहे. याच्या अगोदरच हा प्रकल्प मंजूरी होऊन उभा राहिला पाहिजे होता. दुधात साखरच पडली असती. सर्व शेतकरी बंधू आणि सभासदांचा संपूर्ण पाठींबा आहे. याच्यामुळे कुठलाही तोटा होणार नाही. हा प्रकल्प लवकरात लवकर व्हावा अशी स्थानिकांची सुध्दा इच्छा आहे.

३. श्री. साहेबलाल शेख

रा. सुरेगांव, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर यांनी पुढीलप्रमाणे मुददे मांडले.

आज या ठिकाणी १६ मेगावॅटच्या प्रकल्पाची सुनावणी आयोजित केली आहे हा जो वीज प्रकल्प या ठिकाणी तयार होत आहे याचा आम्हाला शेतक-यांना, सभासदांना आनंदच होत आहे आणि तो झाला पाहिजे. याला फार उशिर झाला यापुर्वीच होऊन जायला पाहिजे होता. याच्या माध्यमातून आमच्या उस उत्पादक शेतक-यांना फायदा होईल. बेरोजगारांना नोकरीची संधी मिळेल आणि तो झाला पाहिजे आमची शेतक-यांची कुठलीही तक्रार नाही.

४. श्री. भाऊसाहेब कचेश्वर लुटे .

रा. कोळगांव थडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर यांनी पुढीलप्रमाणे मुददे मांडले.

आमचे गांव मे. कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या शेजारीच आहे. आजपर्यंत डिस्टीलेरी विभाग, साखर कारखाना विभाग, पेपर मील विभाग हे एकदम लगत असूनसुध्दा आमच्या गावाला या कारखान्यापासुन प्रदूषणाचा कुठलाही त्रास झालेला नाही आणि वेळोवेळी प्रदूषण निवारण करण्याकरिता कारखान्याने सर्वतोपरी प्रयत्न केलेले आहेत. त्यामुळे १६ मेगावॅट वीज निर्मीतीच्या प्रकल्पासाठी आमच्या गावची कोणत्याही प्रकारची हरकत नाही.

५. श्री. पांडुरंग विश्वनाथ ढोमसे .

रा. कोळगांव थडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर यांनी पुढीलप्रमाणे मुददे मांडले.

या १६ मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पाची लवकरात लवकर पुर्तता होवून या प्रकल्पाला आमची कुठलीही हरकत नाही.

६. श्री. सुनंदा रेडडी, पर्यावरणतज्ञ

यांनी इंग्रजीमधुन आपले विचार मांडले व मा. अध्यक्षांच्या सुचने नुसार लेखी प्रतही सादर केली. त्यातील मुददे संक्षिप्तमध्ये खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहेत. १० कि.मी.परिसरातील हवा, पाणी व जमीनीचा अभ्यास कारखान्याच्या सल्लागारांनी योग्य प्रकारे केला असून त्यामुळे भविष्यात योग्य ते पर्यावरण संवर्धनासाठीचे नियोजन करण्यात कारखान्यास मदत होणार आहे. कारखाना परिसरातून पावसाळयात पाणी वाहून जावू नये यासाठी आवश्यक ते साठवण बंधारे उभारण्यात यावेत ज्यामुळे जमीनीतील पाणीची लेव्हल उंचावण्यास मदत होईल व उपलब्ध पाणी गरजेनुसार वापरता येईल. कारखान्याच्या आजूबाजूच्या परिसरातील गांवामध्ये व रस्त्याच्या कडेला हवा प्रदूषण रोखण्यासाठी फळांची व औषधी झाडे लावण्यात यावीत. स्थानीक सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीत प्राधान्य देण्यात यावे, बेरोजगार तरुणांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात यावे, सीएसआर फंडाचा वापर करण्यापुर्वी कारखान्याचे अधिकारी, संबंधित शासकीय अधिकारी व प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी यांनी समन्वय साधुन चांगल्या कामासाठी विनियोग करावा. ऊस लागवडीसाठी व पाण्याचा वापर कमी करण्यासाठी उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी शेतक-यांना प्रोत्साहन देण्यात यावे. कारखान्याच्या प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या व पर्यावरण संवर्धनासाठी आवश्यक ती काळजी घेण्याची विनंती केली.

## प्रकल्प प्रवर्तकाचे / प्रतिनिधीचे उत्तर :

सदर कंपनीचे प्रतिनिधी यांनी सांगितले की, सदर कारखान्याने क्रेप कॉम्पलायन्स केला आहे. सदर कारखान्याने पुरेशा क्षमतेची प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा उभारलेली आहे, ऑनलाईन मॉनिटरींग बसवुन कार्यान्वित केली आहे व सीपीसीबीच्या सर्व्हरल कनेक्ट करण्यात आली आहे. हरितपटटा २५ एकर क्षेत्रावर विकसित करण्यात आला आहे व चालू वर्षी कारखाना परिसरात ५,८०० झाडे लावण्यात आली आहेत व सध्याच्या उदयोगात १०८५ स्थानीक शेतकरी बांधवांना रोजगार देण्यात आला असून त्याची एकुण सरासरी ९० टक्के आहे.

कारखान्याचे प्रतिनिधी यांनी सांगितले की, चालू वर्षी कारखाना परिसरात ५,८०० झाडे लावण्यात आली आहेत व एकुण १५००० वृक्षारोपन करण्यात आलेले असून त्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयास कारखान्याने सादर केलेली आहे.

कारखान्याचे महाव्यवस्थापक यांनी नमुद केले की, सदर सुनावणीत जे जे मुददे उपस्थित करण्यात आले त्यांची नोंद घेण्यात आली आहे. तसेच श्री. सुनंदा रेडडी यांनी ज्या दीर्घ सुचना दिल्या त्या सुचना संचालक मंडळाच्या बैठकीपुढे मांडण्यात येतील आणि पर्यावरण रक्षणासाठी कारखाना कुठेही कमी पडणार नाही असे आश्वासित केले.

## जनसुनावणी समितीने दिलेली प्रतिक्रिया / सूचना :

सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी सदर कारखान्याने क्रेप कॉम्पलायन्स केला आहे का? पुरेशा क्षमतेची प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा उभारलेली आहे का?, ऑनलाईन मॉनिटरींग बसवुन कार्यान्वित केली आहे का? हरितपटटा किती क्षेत्रावर विकसित करण्यात आला आहे व किती झाडे लावण्यात आली आहेत व सध्याच्या उदयोगात स्थानिक शेतकरी बांधवांना रोजगार देण्यात आला आहे का? व किती? इत्यादी प्रश्न उपस्थित केले.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी यांनी मुददा उपस्थित केला की, आपण सादरीकरणात १५००० वृक्षारोपन केल्याचे नमुद केले आहे.

सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी यांनी नमूद केले की, अजुनही कोणाला कांही लेखी किंवा तोंडी सुचना / आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. तसेच उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने कारखाना व्यवस्थापनाने आपली भुमिका या ठिकाणी मांडावी.

सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी यांनी नमूद केले की, या ठिकाणी उपस्थित असलेले प्रशासनातील सहकारी, अधिकारी, कारखाना व्यवस्थापन या परिसरातील सर्व सन्माननीय नागरिक यांनी सदर सुनावणीसाठी जे सहकार्य केले त्याबददल मी आपले सर्वांचे आभार मानतो आणि उपस्थितांपैकी कोणाचेही प्रश्न शिल्लक राहिलेले नाहीत याची खात्री करुन सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर करतो.

( अजित पाटील )
समन्वयक तथा उप प्रादेशाधिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

( अ.म.करे )
सदस्य तथा प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

( प्रशांत पाटील )
अध्यक्ष
पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, अहमदनगर